| | |
|---|---|
| MHSO170003452026 | **नियमित दि.दावा क्रं. ५१/२०२६**<br>**राजेंद्र व इतर वि. सदाशिव व इतर** |

## निशाणी क्र. ५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ मधील आदेश ३९ नियम १ व २ अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेकामी प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचेविरुध्द दाखल केला आहे.

२) **दावा मिळकतीचे वर्णन–**

अ) मौजे लऊळ ता. माढा जि. सोलापूर येथील शेतजमिनीचे वर्णन –

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| | हे. आर | रु. पै. |
| ८१३/१ | ०१-८९<br>पो.ख.००-०३ | ०१-८० |

यासी चतुःसिमा पुर्वेस – गट नं. ७४३/१, पश्चिमेस – गट नं. ८१७/२/क, दक्षिणेस – गट नं. ८१२ व उत्तरेस – ८१६

ब) मौजे लऊळ ता. माढा जि. सोलापूर येथील शेतजमिनीचे वर्णन –

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| | हे. आर | रु. पै. |
| ८१६ | ०१-२१ | ००-९५ |

यासी चतुःसिमा पुर्वेस – गट नं. ७४३/१, पश्चिमेस – गट नं. ८१७/२/क, दक्षिणेस – गट नं. ८१३ व उत्तरेस – ८१७/३/अ, ८१७/३/ब, ८१७/३/क व ८१७/३/ड

क) मौजे लऊळ ता. माढा जि. सोलापूर येथील शेतजमिनीचे वर्णन –

| गट नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|
| | हे. आर | रु. पै. |
| ७४३/१ पैकी | ०६-०२<br>पो.ख.००-०८ | ०४-६५ |

यामधील वादी नं. ५ चे अविभक्त हक्क हिश्याचे क्षेत्र

यासी चतुःसिमा पुर्वेस – गट नं. ७४२, पश्चिमेस – गट नं. ८१३, ८१६ व ८१७/३/अ पैकी, दक्षिणेस – गट नं. ७४४ व उत्तरेस – ७४१

येणेप्रमाणे चतुःसिमेती वर्णनाच्या शेतजमिनी आतील झाड, झुडूप, वृक्षपाषाण वगैरे तदंगभुत वस्तुसह. प्रस्तुत दाव्यात व अर्जात नमूद परिच्छेद क्र. १ मधील १अ ते १क मधील नमूद मिळकती प्रस्तुत दाव्याच्या व अर्जाचा विषय आहेत. (यापुढे सोईसाठी सदर मिळकतीस "दावा मिळकती" असे संबोधले आहे.)

३) वादींचे थोडक्यात कथन की, परिच्छेद क्र. १ मधील नमूद मिळकती १अ ते १क हया वादींच्या मालकी वहिवाटीच्या मिळकत आहेत. सदर दावा मिळकतींच्या पश्चिम बाजूस गट नं. ८१७ ही मिळकत असून सदर गटाचे विभाजन झाले असून त्यापैकी गट नं. ८१७/३/अ ही मिळकत प्रतिवादी क्र. १ चे मालकीची आहे. गट नं. ८१७/३/ब ही मिळकत प्रतिवादी क्र. २ व १७ ते २० यांचे सामाईक मालकीची आहे. गट नं. ८१७/३/क ही मिळकत प्रतिवादी क्र. ३ व ४ यांचे मालकीची आहे. गट नं. ८१७/३/ड ही मिळकत प्रतिवादी क्र. ५ चे मालकीची आहे.

४) वादींचे पुढील कथन की, प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ कलम १४३ अन्वये त्यांचे गट नं. ८१७/३/अ ते गट नं. ८१७/३/ड या मिळकतीमध्ये जाणे–येणेसाठी, “पुर्व–पश्चिम चालीचा कॅनॉल पट्टीने गट नं. ८१३/१ पर्यंत येऊन उत्तरेकडे वळून गट नं. ८१३/१ चे पुर्व बांधाने व गट नं. ७४३/१ चे पश्चिम बांधाने पुढे गट नं. ८१६ चे पुर्व बांधाने व गट नं. ७४३/१ चे पश्चिम बांधावरुन प्रतिवादी क्र. १ यांच्या गट नं. ८१७/३/अ या मिळकती पर्यंत दक्षिण उत्तर चालीचा १५ फुट रुंदीचा नवीन रस्ता मिळणेसाठी त्यांच्या सोयीने खोटा, बनावट व बेकायदेशीर हस्तलिखीत नकाशा दर्शवून नवीन रस्ता" मिळणेकामी माढा येथील तहसिलदार यांचे कोर्टात अर्ज रस्ता केस/कलम १४३/एस आर/०५/२०२५ दाखल केला होता. त्यानंतर, उपविभागीय अधिकारी माढा यांचे दिनांक ०२/०८/२०२४ रोजीचे आदेशान्वये सदर रस्ता केस तहसिलदार करमाळा यांचेकडे वर्ग करण्यात येऊन सदर प्रकरणाला जमा/२/१४३/एस आर/१९/२०२४ असा नंबर देण्यात आला.

५) वादींचे पुढील कथन की, सदर रस्ता केस प्रकरणात तलाठी माढा व तहसिलदार करमाळा यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. परंतु, सदरचा पंचनामा जमीन महसूल कायदा कलम १४३ च्या तरतूदीनुसार केला नाही. तसेच, प्रतिवादी क्र. १ ते ५

यांना त्यांचे गट नं. ८१७ या मिळकतीत जाणे–येणेसाठी पुर्वापार वहिवाटीचा रस्ता असताना प्रतिवादींच्या चुकीच्या मागणीआधारे तहसिलदार करमाळा यांनी वादींच्या गटातील बांधावरुन बेकायदेशीर रस्ता मंजूर केला आहे. प्रतिवादींनी सदर रस्ता केस प्रकरणात आवश्यक पक्षकारांना समाविष्ट नव्हते. त्यामुळे, सदर प्रकरणात आवश्यक पक्षकाराची सुध्दा बाधा येत असून सदर आदेश बेकायदेशीर आहे. वादींचे पुढील कथन की, सदर बेकायदेशीर आदेशाआधारे प्रतिवादीने रस्ता केलेस वादींचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, वादीने प्रस्तुत दाव्यात सदर तहसिलदार करमाळा यांचा रस्ता प्रकरणातील आदेश बेकायदेशीर ठरवून मिळणेकामी विनंती केली आहे व प्रस्तुत अर्जाद्वारे दाव्याचा निकाल लागेपर्यंत सदर चुकीच्या आदेशाआधारे प्रतिवादी क्र. १ ते ५ यांनी वादीच्या दावा मिळकती बांधाचे, त्यावरील झाडांचे नुकसान करुन कोणताही नवीन रस्ता तयार करु नये व वादींचे दावा मिळकतीवरील कब्जास हरकत व अडथळा करु नये अशी विनंती केली आहे.

६) प्रतिवादी क्र. १ ते ६ यांनी दाव्यास व अर्जास नि.क्र. ४३ अन्वये लेखी कैफियत व म्हणणे सादर करुन आक्षेप घेतला आहे. सदर प्रतिवादींनी दावा मिळकतीवरील वादींचा मालकी हक्क व कब्जा तसेच प्रतिवादींच्या मिळकती बाबतचे कथन मान्य केले आहे. परंतु, सदर प्रतिवादींनी बेकायदेशीर अर्ज केला व तहसिलदार यांनी बेकायदेशीर आदेश पारित करुन नवीन रस्ता मंजूर केला हे कथन स्पष्टपणे नाकारले आहे. सदर प्रतिवादींचे कथन की, त्याचे मिळकतीत जाणे–येणेसाठी रस्ता नसल्यामुळे त्यांनी नवीन रस्त्याची मागणी केली होती. तहसिलदार करमाळा यांनी घटनास्थळाचे पंचनामे करुन कायदेशीर तरतूदीनुसार प्रतिवादींना रस्ता नसल्याने नवीन रस्ता मंजूर केला आहे. त्यामुळे, सदर तहसिलदार यांचा आदेश कायदेशीर आहे असे कथन करुन प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

७) वादींनी अर्जातील कथनाच्या पुष्टयर्थ निशाणी क्र. ४ वरील यादीसोबत वादी व प्रतिवादींचे मिळकतींचे सातबारा उतारे, रस्ता केस क्रमांक ५/२०१९ या प्रकरणातील तहसिलदार, माढा यांनी केलेली पंचनामा प्रत, रस्ता केस क्र. १९/२०२४ यामधील तहसिलदार, माढा यांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत, सदर रस्ता केस क्र. १९/२०२४ या प्रकरणातील तहसिलदार, करमाळा यांनी पारित केलेल्या आदेशाची प्रत अशी कागदपत्रे दाखल केली आहेत.

८) प्रतिवादींनी नि.क्र. ३२ वरील यादीसोबत या दाव्यातील प्रतिवादी क्र. ७ यांनी वादी व इतर प्रतिवादींविरुध्द सदर तहसिलदार यांचा आदेश रेमुनं. ३७/२०२६ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचेकडील प्रलंबित दाव्यात आव्हानित केलेबाबत सदर दाव्याची प्रत व सदर न्यायालयाने तुर्तातूर्त मनाई हुकूम नामंजूर केल्याची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे.

९) प्रस्तुतचा अर्ज, म्हणणे व दाखल कागदपत्राचे अवलोकन केले. वादींचे सुविद्य विधीज्ञ श्री. के. डी. वाळूजकर व प्रतिवादी क्र. १ ते ५ यांचे सुविद्य विधीज्ञ श्री. जी. एस. त्रिंबके यांचा युक्तीवाद ऐकला. सदर वादी व प्रतिवादी यांचे सुविद्य विधीज्ञांनी अर्जातील कथन व त्यांचे म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. वादींचे विधीज्ञ यांनी त्यांचे युक्तीवादापुष्टयर्थ मा. उच्च न्यायालय यांनी पारित केलेल्या खालील नमूद न्यायनिवाडयांवर भिस्त ठेवली आहे.

***१. अक्षय सोमा अभिवंत वि. महाराष्ट्र शासन[1],***

***२. जगदंबा ऑईल एजन्सी वि. के. एस. ऑईल्स लि. आणि इतर[2],***

***३. इंडियन बँक वि. महाराष्ट्र स्टेट कॉ. ऑप मार्केटिंग फेडरेशन लि.[3]***

१०) प्रस्तुत अर्जाच्या निर्णयासाठी माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित होत असुन त्याचे निष्कर्ष कारणमिमांसेसह त्याखाली नमुद केलेले आहेत.

| अ.क्रं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादींनी असे सिद्ध केले आहे काय की, प्रथमदर्शनी दावा वादींच्या बाजूने आहे ? | नाही |
| २) | वादींच्या बाजूने नैसर्गिक न्यायाचा समतोल आहे काय ? | नाही |
| ३) | अर्ज मंजुर केला नाही तर वादींचे कधीही न भरुन येणारे अतोनात नुकसान होईल, हे वादींनी सिद्ध केले आहे काय ? | नाही |
| ४) | काय आदेश? | अर्ज नामंजुर करण्यात येतो. |

1 Writ Petition No. 7844/2023 dated 31.07.2024 indiankanoon.org
2 Order dated 25.10.2005 indiankanoon.org
3 Judgment of Hon'ble Supreme Court dated 05.05.1998 indiankanoon.org

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ –**

११) वादींनी प्रस्तुत दावा व अर्जाव्दारे तहसिलदार, करमाळा यांनी वादींविरुध्द पारित केलेला रस्ता प्रकरण क्र. १९/२०२४ मधील अंतीम आदेश आव्हानीत केला आहे. वादींचे कथन की, सदर आदेशान्वये तहसिलदार, करमाळा यांनी प्रतिवादींना त्यांचे मिळकतीत जाणे–येणकामी दुसरा रस्ता उपलब्ध असताना सदर प्रतिवादींना, "त्यांचे मौजे लऊळ, ता. माढा येथील जमीन गट नं. ८१७/३/अ, ८१७/३/ब, ८१७/३/क, ८१७/३/ड मध्ये जाणे–येणेसाठी जमीन गट नं. ८१३/१ चे पुर्व बांधाने व गट नं. ७४३/१, ८१६, ८१७/३/अ चे दरम्यान असलेल्या बांधावरुन १२ फुट रुंदीचा नवीन रस्ता बेकायदेशीरपणे मंजूर केला आहे" असे आहे. त्यामुळे, सदर वादीचे कथन व दाव्याचे स्वरुप विचारात घेता, प्रथमदर्शनी दावा व कायद्याचा समतोल वादीच्या बाजुने आहे काय हे पाहण्यासाठी तहसिलदार यांनी पारित केलेला रस्ता प्रकरण क्रमांक १९/२०२४ मधील अंतीम आदेश प्रथमदर्शनी नैसर्गिक न्यायतत्वाआधारे पारित केला नसून तसेच कायदेशीर प्रक्रिया अवलंब न करता बेकायदेशीररित्या पारित केला आहे किंवा कसे हे पाहणे क्रमप्राप्त आहे.

१२) अभिलेखावरील वादी यांनी दाखल केलेल्या रस्ता प्रकरण १९/२०२४ या प्रकरणातील तहसिलदार, करमाळा यांनी दि. १८/११/२०२५ रोजीचा पारित केलेला आदेश, दि. ०१/०४/२०२४ व दि. १०/०६/२०२५ रोजीचे रस्ता केसबाबत केलेले पंचनामे याचे अवलोकन केले असता, प्रस्तुत रस्ता केसमध्ये तहसिलदार, करमाळा यांनी प्रतिवादींना त्यांचे मिळकतीत म्हणजेच गट नं. ८१७/३/अ ते गट नं. ८१७/३/ड यामध्ये जाणे–येणेसाठी जमीन गट नं. ८१३/१ चे पुर्व बांधाने व गट नं. ७४३/१, ८१६, ८१७/अ चे दरम्यान असलेल्या बांधावरुन नवीन रस्ता मंजूर केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते.

१३) वादींनी प्रतिवादींना त्यांचे मिळकतीत जाणे–येणेसाठी दुसरा रस्ता उपलब्ध असताना बेकायदेशीररित्या रस्ता मंजूर केला आहे असे कथन केले आहे. परंतु, सदर रस्ता केसमधील दि. ०१/०४/२०२४ रोजी अप्पर तहसिलदार, माढा व दि. १०/०६/२०२५ रोजी तलाठी मौजे लऊळ यांनी केलेल्या पंचनाम्याचे अवलोकन केले असता सदर दोन्ही पंचनाम्यामध्ये प्रतिवादींना गट नं. ८१७/३/अ ते ८१७/३/ड या

मिळकतींच्या क्षेत्रापर्यंत जाणारा रस्ता दिसून आला नाही असे स्पष्टपणे नमूद केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. सदर दोन्ही पंचनामे ऐकमेकांशी सुसंगत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादींनी सदर दोन्ही पंचनामे शंकास्पद असलेबाबत दर्शवण्यासाठी कोणताही ठोस कागदोपत्री पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. सदर पंचनामे झाल्यानंतर तहसिलदार, करमाळा यांनी दि. १८/११/२०२५ रोजी आदेश पारित केला आहे. वादींना सदर पंचनामे रस्ता प्रकरणात आव्हानित करणेकामी सदर पंचनामे झाल्यापासून ते आदेश होईपर्यंतच्या कालावधीत आव्हानित करण्याची संधी होती. परंतु, वादींनी सदर पंचनामे आदेश होईपर्यंत आव्हानित केले नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, निकालानंतर केवळ मोघम कथनाआधारे सदर पंचनामे बेकायदेशीर आहेत असे मानणे सद्य स्थितीत संयुक्तिक होणार नाही.

१४) वादींनी अर्जात कथन केले आहे की, तहसिलदार, करमाळा यांचेसमोरील सदर रस्ता प्रकरणात आवश्यक पक्षकार सामील करण्यात आले नव्हते. तसेच, तहसिलदार यांना उपगटाच्या बांधावरुन कलम १४३ जमीन महसूल कायदा अंतर्गत रस्ता देण्याचे कुठलेही अधिकार नाहीत असे कथन केले आहे. सदर कथनाच्या अनुषंगाने तहसिलदार यांचे आदेशाचे अवलोकन केले असता तहसिलदार यांनी वादींना पुरेपूर संधी देऊन वादींचे म्हणणे विचारात घेऊन सदर आदेश पारित केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, वादींचे सदर कथन हे पुरावा सादर केल्यानंतर विचारात घेतले जाऊ शकते.

१५) सद्यस्थितीत तहसिलदार, करमाळा यांनी रस्ता प्रकरणात त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांतर्गत त्यांनी स्थळपाहणी पंचनामा केले असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच, वादींना सदर पंचनाम्यावर म्हणणे सादर करण्याची संधी देऊन, वादी यांचा युक्तीवाद ऐकून कायदेशीर प्रक्रियेचा व नैसर्गिक न्यायतत्वाचा अवलंब करुन तहसिलदार यांनी अंतीम आदेश पारित केला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, वादी यांचे तोंडी मोघम कथनाआधारे सदर तहसिलदार यांच्या आदेशात हस्तक्षेप करणेसाठी प्रथमदर्शनी दावा व कायदयाचा समतोल वादींच्या बाजूने असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही. तसेच, तहसिलदार, करमाळा यांनी वादींच्या जमिनीतून रस्ता दिला असे वादींचे कथन नसून सदर आदेशामध्ये वादी व प्रतिवादी यांच्या गटांच्या बांधावरुन रस्ता दिला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्यामुळे, अर्ज नामंजूर झाल्यास वादींचे कोणतेही नुकसान होत नाही. परंतु, अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचे नुकसान होत असल्याचे

प्रथमदर्शनी दिसून येते.

१६) वादींनी ***अक्षय सोमा अभिवंत वि. महाराष्ट्र शासन, जगदंबा ऑईल एजन्सी वि. के. एस. ऑईल्स लि. आणि इतर व इंडियन बँक वि. महाराष्ट्र स्टेट कॉ.ऑप मार्केटिंग फेडरेशन लि. (वर नमूद)*** या प्रकरणांमधील सादर केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी पारित केलेल्या न्यायनिवाडयांचे अवलोकन केले. परंतु, सदर प्रकरणामधील वाद कथन व प्रस्तुत दाव्यातील परिस्थिती ही वेगवेगळी असल्याने सदर न्यायनिवाडयातील आदरपुर्वक निष्कर्षांची मदत वादींना सद्यपरिस्थितीत होऊ शकत नाही. त्यामुळे, प्रथमदर्शनी दावा व कायद्याचा समतोल वादींचे बाजूने प्रथमदर्शनी नसल्याचे दिसून येत असल्याने तसेच अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादींचेच नुकसान होत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने मुद्दा क्र. १ ते ३ चे नकारार्थी नोंदवण्यात येत आहेत.

**मुद्दा क्रमांक ४–**

१७) मुद्दा क्रमांक १ ते ३ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्यामुळे अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश–

## आदेश

१) अर्ज नामंजूर करण्यात येतो.

२) वादी व प्रतिवादींनी अर्जाचा खर्च आपआपला सोसावा.

ANAY DNYANESH KULKARNI
Digitally signed by ANAY DNYANESH KULKARNI
Date: 2026.06.25 17:02:18 +0530

दिनांक – २५/०६/२०२६

(**अनय ज्ञा. कुलकर्णी**)
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माढा

| CERTIFICATE | | |
|---|---|---|
| I affirm that, the contents of this P.D.F. file Order/Judgment is same word to word, as per the original order/judgment. | | |
| Name of Stenographer | : | M.P.Dixit Grade-3 |
| Court Name | : | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Madha. |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 25/06/2026 |
| Order/Judgment uploaded on | : | 25/06/2026 |